# हार्दिक पंड्याची फेरारीनंतर नवी कार!

## १.४ कोटींची खरेदी; भारतात ही कार घेणारा पहिला व्यक्ती ठरला

**महाईन्यूज । मुंबई**

**हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखाली मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२६ मधील सलामीचा सामना खेळण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. यादरम्यान हार्दिक पंड्याने अजून एक नवी लक्झरी कार खरेदी केली आहे. हार्दिक पंड्याने अवघ्या सहा महिन्यांत आपली चौथी आलिशान कार खरेदी केली आहे. यावेळी त्याने नुकतीच लॉन्च झालेली कार खरेदी केली असून, ही कार खरेदी करणारा तो पहिला भारतीय ठरला आहे.**




हार्दिक पंड्याला लक्झरी कार आणि घड्याळांच शौक असल्याचं आपण त्याच्या कलेक्शनवरूनच पाहू शकतो. हार्दिककडे अनेक महागडी घड्याळ असल्याचं आपण सामन्यांदरम्यान पाहिलं आहे. याशिवाय त्याच्याकडे एकापेक्षा एक कमालीच्या कार आहेत. यामध्ये भारतात लॉंच झालेली कोटींमध्ये किंमत असलेली कार त्याने खरेदी केली आहे.

हार्दिक पांड्याने यावेळी आपल्या कलेक्शनमध्ये मर्सिडीज-बेंझ व्ही-क्लासची भर घातली आहे. विशेष म्हणजे, तो या नवीन पिढीच्या मर्सिडीज व्ही-क्लासचा मालक असलेला भारतातील पहिला व्यक्ती ठरला आहे. या आलिशान कारची किंमत अंदाजे १.४ कोटी आहे. ही कार आरामदायक कौटुंबिक प्रवासासाठी ओळखली जाते, या कारचं इंटेरियर स्पेशियस आहे, समोरासमोर सीट्स आहेत आणि हाई एंड फिचर्सदेखील आहेत.

हार्दिक पांड्याकडे आधीच अनेक महागड्या व आलिशान कार आहेत. त्याच्या अलीकडील खरेदीमध्ये, त्याने अंदाजे ४ कोटी किमतीची लँड रोव्हर डिफेंडर खरेदी करून ती आपल्या मुलाला भेट दिली. अंदाजे १२ कोटी किमतीची १२-सिलेंड्री फेरारी देखील त्याच्या कार कलेक्शनमध्ये सामील आहे. त्याने अंदाजे ४.५ कोटी किमतीची लॅम्बोर्गिनी उरुस देखील खरेदी केली आहे.

हार्दिक पंड्या त्याची गर्लफ्रेंड महिका शर्मासोबत मर्सिडीज-बेंझ व्ही-क्लास कारच्या डिलिव्हरीसाठी आला होता, ज्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यापूर्वी तो महिका शर्मासोबत फेरारीच्या १२-सिलेंड्री कारमधून फिरतानाही दिसला होता.

## हिटमॅनचा 'हिट' शो!




मुंबई इंडियन्सने १४ वर्षांनी जिंकला सलामीचा सामना

# IPL सोडणाऱ्या खेळाडूंवर सुनील गावस्कर संतापले, BCCIकडे केली 'ही' मागणी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंडियन प्रीमियर लीग (IPL) २०२६ च्या हंगामापूर्वी दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेटने आगामी हंगामातून माघार घेण्याचा निर्णय घेतला असून, त्याच्या या निर्णयावर भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी खडेबोल सुनावले आहेत. शेवटच्या क्षणी माघार घेणाऱ्या विदेशी खेळाडूंवर बीसीसीआयने अधिक कठोर कारवाई करावी, अशी मागणी गावस्कर यांनी केली आहे.**






दिल्ली कॅपिटल्सने लिलावात बेन डकेटला २ कोटी रुपयांना खरेदी केले होते. तो केएल राहुलसोबत डावाची सुरुवात करेल अशी अपेक्षा होती. आपल्या निर्णयाचे समर्थन करताना डकेट म्हणाला, "आयपीएलमधून माघार घेणे आणि मोठ्या रकमेवर पाणी सोडणे हा निर्णय सोपा नव्हता. जगातील सर्वोत्तम खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मी गमावत आहे, पण इंग्लंडसाठी खेळणे माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे सिद्ध करण्यासाठी मी हे पाऊल उचलले आहे." दरम्यान, इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी बेन डकेट याने आयपीएलमधून माघार घेतली असली तरी स्पर्धेला अवघे काही दिवस उरले असताना घेतलेल्या या निर्णयामुळे दिल्लीच्या नियोजनावर परिणाम झाला आहे.

'इंडिया टुडे'शी बोलताना गावस्कर म्हणाले, "आयपीएलमधून एखाद्या खेळाडूने माघार घेतली तर सध्या लागू असलेली दोन वर्षांची बंदी पुरेशी ठरत नाहीये, हे स्पष्ट आहे. बीसीसीआयने आता अशा काही ठोस उपाययोजनांचा विचार करायला हवा ज्याचा खेळाडूंवर खरोखर परिणाम होईल. जोपर्यंत खेळाडूच्या आयपीएलमधील पुनरागमन करण्याच्या संधीवर परिणाम होत नाही, तोपर्यंत असे नियम काम करणार नाहीत. डकेटला 'द हंड्रेड' स्पर्धेत चांगली किंमत मिळाल्यामुळे कदाचित त्याने आयपीएलपेक्षा इंग्लंडच्या कसोटी कारकिर्दीला प्राधान्य देणे सोयीचे मानले असावे, असेही गावस्कर यांनी स्पष्ट केले.

### बीसीसीआयचा सध्याचा नियम काय?

'बीसीसीआय'च्या सध्याच्या नियमांनुसार, आयपीएल लिलावात खरेदी केल्यानंतर वैयक्तिक कारणास्तव शेवटच्या क्षणी माघार घेणाऱ्या विदेशी खेळाडूंवर दोन वर्षांची बंदी घातली जाते. या काळात संबंधित खेळाडू आयपीएल किंवा लिलावात सहभागी होऊ शकत नाही.